वर्ष १० वे

अंक १ ला

सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण

## विद्यार्थी वसतिगृह उद्‌घाटन व लोकार्पण सोहळा, वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व दानशूरांचा गौरव कार्यक्रम

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**निर्मला लॉन्स, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे-३३**

**रविवार दि. १७.०१.२०१० रोजी सकाळी १० वाजता**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

यांचे मुखपत्र

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- बांधकामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.१ कोटी २० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०′ X १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**नोव्हें.-डिसें. २००९**

**जाने.-फेब्रु.-मार्च २०१०**

फक्त सभासदांकरिता

(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक २ जानेवारी २०१० )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. १७.०१.२०१०** रोजी **११.०० वा. निर्मला लॉन्स, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३** येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.१०.०८.२००८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २००८-२००९ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०१० ते २०११ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २००९ ते २०१० साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-** १) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. २) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी दुपारी १२.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल. ३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.१५.०१.२०१०** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**टीप :- सदर कार्यक्रमाच्या अगोदर मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहाचा उद्‌घाटन व लोकार्पण सोहळा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व दानशूरांचा गौरव समारंभ होणार आहे.**

**कार्यक्रम संपल्यानंतर मंडळातर्फे भोजनाची व्यवस्था केलेली आहे.**

**✽ आपले नम्र ✽**

| | | |
|---|---|---|
| **हौसाराम विठ्ठलराव घोडके**<br>अध्यक्ष | **सखाराम कोंडिबा गागरे**<br>उपाध्यक्ष | **बाजीराव झुंजारराव जगदाळे**<br>सेक्रेटरी |
| **सुनील कुंडलीक पोटे**<br>सहसेक्रेटरी | **डॉ.बाळासाहेब बांडे**<br>कार्यवाहक | **मधुकर हौशाभाऊ शिरोळे**<br>सहकार्यवाहक |

**सदस्य :- इंजि.विजयकुमार गोविंदराव ढुबे, अशोक विश्वनाथ वाबळे, भाऊसाहेब गंगाराम नरड, सुनील सूर्यभान कोल्हे, काशिनाथ बापूराव गायकवाड, रामदास सोनाजी शिर्के, साहेबराव गंगाधर मोरे, मुरलीधर पंढरीनाथ चौधरी, प्रा.अभिमान सोपानराव तराळ, रामदास गवराम पुजारी, तारकराम सिताराम झावरे, बाळासाहेब हरिभाऊ येणारे.**

### ✽ कार्यक्रमाचे स्थळ ✽

रविवार दि.१७.०१.२०१० रोजी सकाळी १० वा. निर्मला लॉन्स, मंगल नगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ३३.

**कार्यालय संपर्क मोबाईल नं. : (निर्मला लॉन्स) ९०११०४२०६९**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.

## विद्यार्थी वसतिगृह उद्घाटन व लोकार्पण सोहळा, स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व दानशूरांचा गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा विद्यार्थी वसतिगृह उद्घाटन व लोकार्पण सोहळा, वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व दानशूरांचा गौरव कार्यक्रम **रविवार दि.१७ जानेवारी २०१०** रोजी **सकाळी १०** वाजता **निर्मला लॉन्स, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३** येथे खालील सन्मानियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

**❊ अध्यक्ष ❊**

**मा.पद्मभूषण डॉ.आण्णासाहेब हजारे**
समाजसेवक

**❊ प्रमुख पाहुणे ❊**

**आमदार सिताराम घनदाट**
गंगाखेड, जि.परभणी व चेअरमन अभ्युदय को-ऑप.बँक मुंबई

**आमदार विलास लांडे**
भोसरी, पुणे

**आमदार लक्ष्मण जगताप**
चिंचवड

**मा.कांतीलालजी खिंवसरा**
उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते

**आमदार विजयराव औटी**
पारनेर तालुका

**मा.श्रीरंग उर्फ आप्पा बारणे**
नगरसेवक, पिंपरी चिंचवड म.न.पा.

**मा.नानजीभाई ठक्कर**
उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**❊ आपले नम्र ❊**

**हौसाराम विठ्ठलराव घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार गोविंदराव ठुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**बाजीराव झुंजारराव जगदाळे**
सेक्रेटरी व अध्यक्ष, निधी समिती

**सखाराम कोंडिबा गागरे**
उपाध्यक्ष

**सुनील कुंडलीक पोटे**
सहसेक्रेटरी

**मधुकर हौशाभाऊ शिरोळे**
सहकार्यवाहक

**डॉ.बाळासाहेब बांडे** (कार्यवाहक)

**सदस्य :- अशोक विश्वनाथ वाबळे, भाऊसाहेब गंगाराम नरड, सुनील सूर्यभान कोल्हे, काशिनाथ बापूराव गायकवाड, रामदास सोनाजी शिर्के, साहेबराव गंगाधर मोरे, मुरलीधर पंढरीनाथ चौधरी, प्रा.अभिमान सोपानराव तराळ, रामदास गवराम पुजारी, तारकराम सिताराम झावरे, बाळासाहेब हरिभाऊ येणारे.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

पारनेर तालुका मित्र मंडळाच्या सर्वोच्च आनंदाच्या क्षणाचे संपादकीय आपणापुढे ठेवताना मला खूप खूप आनंद होतोय! असंख्य कार्यकर्ते व हितचिंतक यांनी दिलेल्या योगदानाच्या बळावर दि.१० ऑगस्ट २००८ रोजी चिंचवड (थेरगाव) येथील डांगे चौकाजवळील आपल्या संस्थेच्या मालकीच्या ५००० चौ.फूट जागेमध्ये विद्यार्थी वसतिगृहाचे भूमीपुजन मान्यवरांच्या हस्ते झाले होते. त्याच वास्तुचे उद्‌घाटन व लोकार्पण सोहळा साजरा करण्याचा दिवस आता जवळ येतोय ! पारनेर तालुक्याचे **भूमीपुत्र व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सामाजिक कार्यकर्ते मा.पद्मभूषण डॉ.आण्णासाहेब हजारे** यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पारनेर तालुका मित्र मंडळाच्या ३ मजली विद्यार्थी वसतिगृहाचे रविवार **दि. १७ जानेवारी २०१०** रोजी उद्‌घाटन होत आहे. सर्व कार्यकर्ते व हितचिंतक यांनी योगदान दिल्यामुळेच ही **५० लाख रुपये** किमतीची इमारत उभी राहिली आहे. या धाडसी प्रकल्पाचे श्रेय निश्चितपणे **मित्र मंडळाच्या कार्यकारिणीलाच** जाते. त्यामध्ये विशेष करुन सिंहाचा वाटा आहे तो मंडळाचे **अध्यक्ष शिवश्री हौसाराम घोडके** यांचाच !

**शिवश्री हौसाराम घोडके** यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने आतापर्यंत **रु.६० लक्ष** निधी गोळा केला असून अधिक निधी गोळा करण्यासाठी त्यांचे अथक प्रयत्न सुरुच आहेत. पहिल्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण झाले असून त्यामध्ये इमारतीचे तीन मजले बांधले आहेत. या टप्प्यामध्ये **सुसज्ज** अशा एकूण **२० खोल्या** विद्यार्थ्यांसाठी तयार झाल्या असून त्यामुळे **८०** विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय होणार आहे. **विशेष म्हणजे सर्व २० खोल्यांसाठी देणगीदार मिळालेले आहेत.** वसतिगृह प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मंडळाच्या बांधकाम समितीने माझ्याच नेतृत्वाखाली प्रयत्न केले आहेत. बांधकाम करण्यासाठी **शिवश्री संजय बागडे** (आर्किटेक्ट), **शिवश्री विजय खिलारी** (आर.सी.सी. डिझायनर), **शिवमती सुजाता ठुबे** व बांधकाम समितीचा अध्यक्ष म्हणून मी स्वतः तसेच **शिवश्री अशोक वाबळे, शिवश्री मधुकर शिरोळे** व **शिवश्री हौसाराम घोडके** यांनी मनापासून योगदान देत खूप कष्ट घेतले आहेत. योगदान देणाऱ्या सर्व व्यक्ती तालुक्यातीलच असून बांधकाम चांगल्या दर्जाचे होण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले आहेत. सर्व सभासदांच्या वतीने मी त्यांना धन्यवाद देतो.

मंडळाचे अध्यक्ष **शिवश्री हौसाराम घोडके, शिवश्री बाजीराव जगदाळे, शिवश्री सखाराम गागरे** व इतर सदस्यांनी प्रयत्न केल्यामुळे बऱ्याच मंडळींनी **समाधानी वृत्तीने व मोकळ्या मनाने** मंडळास बांधकामासाठी देणगी दिली आहे. त्यातील काही मान्यवरांचा प्रातिनिधीक स्वरुपात परिचय याच अंकात स्वतंत्रपणे दिला आहे. या सर्व देणगीदारांचा मी **ऋणी** आहे. **मुलींचेही वसतिगृह** सुरु करण्याचा मंडळाचा मानस आहे. त्यासाठीपण कमीत कमी ५५०० चौ.फुट जागा व बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. दानशूर मंडळींकडून प्रतिसाद मिळावा ही अपेक्षा!

मंडळ ज्या वाटेवरून जात आहे त्यावरून वरचे आणखी **दोन मजलेही** लवकरच बांधून, आणखी **८०** विद्यार्थ्यांची सोय होईल, अशी मला खात्री वाटते. त्यासाठी आपण सर्वांनी अवश्य **कार्यक्रमास हजर राहून** वसतिगृहाला भेट द्यावी**.** मंडळापुढे आणखी दोन मजल्यांच्या बांधकामाव्यतिरिक्त बरीच **सामाजिक** कामे करण्याचे नियोजन आहे. ती सर्व पार पाडण्यासाठी आपल्या सर्वांच्या **तन, मन व धनाची** गरज आहे. ती गरज पूर्ण होण्यासाठी जिजाऊ आपणा सर्वांना प्रेरणा देवो. ही अपेक्षा!

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक


## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० | श्री.रामदास पुजारी | सदस्य | ९३२५८६४११३ |
| श्री.सखाराम गागरे | उपाध्यक्ष | ९७३००७५०३३ | प्रा.अभिमान तराळ | सदस्य | ९२७२१८०९६८ |
| श्री.बाजीराव जगदाळे | सेक्रेटरी | ९०११०२१४३० | श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.सुनील पोटे | सहसेक्रेटरी | ९२२६९२१०८८ | श्री.साहेबराव मोरे | सदस्य | ९८२२०६४६९९ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | कार्यवाहक | ९८२२०५१५९३ | श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.मधुकर शिरोळे | सहकार्यवाहक | ९९२२१६६१२५ | श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| श्री.रामदास शिर्के | अंतर्गत लेखा परिक्षक | ९४२२०१६७६४ | श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | सदस्य | ९४२२०२६२२५ | श्री.अशोक वाबळे | सदस्य | ९८८१६०८३५७ |


# रु.२५०००/- पेक्षा जास्त देणगी देणाऱ्या दानशूरांचा गौरव



**सौ.सुजाता विजयकुमार ठुबे** रा.कान्हूर पठार या स्वतः सिव्हील इंजिनियर असून त्यांची सल्लागार फर्म आहे. मंडळाच्या वसतिगृहाच्या कामाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती. त्याची सल्ला फी एकूण **रु.१,५०,०००/-** झाली होती. ती त्यांनी न घेता मंडळास देणगी दिली.



मंडळाचे अध्यक्ष **श्री.हौसाराम विठ्ठलराव घोडके** रा.पारनेर यांनी आतापर्यंत मंडळास **रु.१,२५,०००/-** देणगी दिली.



मे.पार्श्वनाथ पेपर कंपनीचे मालक व बांधकाम व्यवसायीक **श्री.सुनील शांतीलालजी बोकारिया** रा.कान्हूर पठार यांनी आई-वडीलांच्या स्मरणार्थ प्रत्येकी रु.६१,०००/- प्रमाणे **रु.१,२२,०००/-** देणगी दिली.



सुपरटेक इंडस्ट्रीजचे मालक व प्रबोधनकार **श्री.नानासाहेब पाटीलबुवा खोडदे** रा. किन्ही यांनी आई-वडीलांच्या स्मरणार्थ **रु.१,१५,५०१/-** देणगी दिली.



आर्किटेक्ट **श्री. संजय गेणू बागडे** रा.हंगे यांचेकडे वसतिगृह इमारतीचे आरेखन सोपविले होते. त्यांची तांत्रिक सल्ला फी **रु.१,०६,०००/-** त्यांनी न घेता ती मंडळास देणगी दिली.



अंजना मेडीकल व सोशल फाऊंडेशन ट्रस्टचे प्रमुख व रुपी बँकेचे डायरेक्टर **श्री.विश्वनाथ कोरडे** यांनी वडीलांचे स्मरणार्थ मंडळास **रु.१,०४,५००/-** देणगी दिली.


बांधकाम व्यवसायीक **श्री.रामनाथ पर्वतराव गुंजाळ,** रा. पुणे यांनी मातोश्री कै.सुगंधाबाई यांचे स्मरणार्थ मंडळास **रु.१,००,०००/-** देणगी दिली.




आमदार **श्री.विजयराव औटी** यांनी वडीलांचे स्मरणार्थ **रु.१,००,०००/-** देणगी दिली.




मे.युनिव्हर्सल फोर्सेसचे कार्यकारी संचालक **श्री.प्रदीप धोंडीबा ढोकरे** रा.कोठे, ता.संगमनेर यांनी वडीलांच्या स्मरणार्थ मंडळास **रु.८१,००१/-** देणगी दिली.



किर्लोस्कर न्यूमॅटीक मधून व्हाईस प्रेसिडेंट म्हणून सेवानिवृत्त झालेले **श्री.रामचंद्र आनंदराव शिंदे** रा. डिकसळ यांनी आई वडिलांच्या स्मरणार्थ **रु.७८,१११/-** देणगी दिली.




बी.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे कार्यकारी संचालक व बांधकाम व्यवसायीक **श्री.विष्णू उर्फ बाळासाहेब महादेव मातेरे** यांनी आई-वडीलांच्या स्मरणार्थ **रु.७५,०००/-** देणगी दिली.



**श्री. दिपक भालचंद्र ठुबे,** कार्यकारी अभियंता, पिंपरी चिंचवड महापालीका (सेवानिवृत्त) रा.कान्हूर पठार यांनी मंडळास **रु.६८,०००/-** देणगी दिली.



आय.सी.आय.सी.आय. बँकेचे घर कर्ज विभागाचे जनरल मॅनेजर व आता वित्तीय संस्थेचे संचालक असलेले **श्री.सुनील गंगाधर रोहकले** रा.भाळवणी यांनी मंडळास **रु.६६,०००/-** देणगी दिली.



आदर्श शिक्षक व पुणे जिल्हा शिक्षण मंडळातून प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झालेले **श्री. शिवाजी राघूजी बांडे** रा.टाकळी ढोकेश्वर यांनी वडीलांचे स्मरणार्थ मंडळास **रु.६६,०००/-** देणगी दिली.

# रु.२५०००/- पेक्षा जास्त देणगी देणाऱ्या दानशूरांचा गौरव



प्रसिद्ध भूलतज्ञ व मंडळाचे कार्यवाहक **डॉ.बाळासाहेब बांडे** यांनी मंडळास **रु.६५,७५०/-** देणगी दिली.



कदम टाईप प्रोसेसिंगचे मालक व ज्यांना आतापर्यंत अनेक व्यवसायीक सन्मान झाले असे **श्री.संजय बाबुराव कदम** रा.पिंपरी जलसेन यांनी मंडळास **रु.६५,५००/-** देणगी दिली.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु **डॉ.शहाबुद्दीन नूहमहंमद पठाण** रा.पिंपरी जलसेन यांनी आईच्या स्मरणार्थ मंडळास **रु.६४,०००/-** देणगी दिली.



झावरे प्रोफेशनल ॲकॅडमीचे संचालक प्रसिद्ध चार्टर्ड अकाऊंटंट **श्री.शिवाजीराव भिकाजी झावरे** रा.गारगुंडी यांनी वडीलांचे स्मरणार्थ मंडळास **रु.६३,०००/-** देणगी दिली.




इन्फोटेक टेक्नॉलॉजीच्या संचालक **श्रीमती कमलाबाई भागचंद कर्नावट** रा.खडकवाडी यांनी त्यांच्या पतीचे स्मरणार्थ मंडळास **रु.६२,०००/-** देणगी दिली.




योगशिक्षीका **श्रीमती विमलाबाई कृष्णराव काळे** रा. पिंपरी जलसेन यांनी त्यांच्या पतीचे स्मरणार्थ मंडळास **रु.६१,००१/-** देणगी दिली.



कै.सरस्वतीबाई बाळासाहेब देशमाने रा.पारनेर यांचे स्मरणार्थ सुकन्या **सौ.सुमन रामचंद्र देशमाने बोरुडे,** डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य (सेवानिवृत्त) व जामात **ॲड.रामचंद्र विठोबा बोरुडे** रा.पिंपरी जलसेन यांनी मंडळास **रु.६१०००/-** देणगी दिली.




अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य (सेवानिवृत्त) व अहमदनगर जिल्हा मित्र मंडळाचे अध्यक्ष **श्री.भास्करराव भिकाजी शेळके** रा.भोंद्रे यांनी वडीलांचे स्मरणार्थ **रु.६१,००१/-** देणगी दिली.




शिक्षिका पेशा ते उद्योजक असा यशस्वी प्रवास केलेले कुबेर इंजिनियरींग वर्क्सचे कार्यकारी संचालक **श्री. भगवान सावळेराम पठारे** रा. राळेगण सिद्धी यांनी त्यांचे जेष्ठ बंधू कै.संपतराव यांचे स्मरणार्थ मंडळास रु.६१,०००/- देणगी दिली.



**श्री.सखाराम मारुतराव जगताप** (जनरल मॅनेजर सेवानिवृत्त) रा.गोरेगाव यांनी आईच्या स्मरणार्थ मंडळास **रु.६१,०००/-** देणगी दिली.



ग्रीनक्राफ्ट इंटरनॅशनल प्रा.लि. चे कार्यकारी संचालक **श्री.पोपटराव सोनाजी देशमुख**, रा.पळवे यांनी वडीलांचे स्मरणार्थ मंडळास **रु.६१,०००/-** देणगी दिली.



आयुर्वेदीक औषधाचे निर्माते व पुरवठादार **श्री. गिरीश दगडूलाल गांधी** रा.पारनेर यांनी आई-वडीलांचे स्मरणार्थ मंडळास **रु.५१,०००/-** देणगी दिली.



जय भवानी माता इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक **श्री.रंगनाथ विठ्ठल सालके** रा.जवळे यांनी मंडळास **रु.४१,०००/-** देणगी दिली.



सनकॉन इंजिनियर्सचे कार्यकारी संचालक **श्री.राजेंद्र बबनराव मगर** रा. वाघुंडे यांनी मंडळास **रु.३७,०००/-** देणगी दिली.


# रु.२५०००/- पेक्षा जास्त देणगी देणाऱ्या दानशूरांचा गौरव




प्रसिद्ध डॉक्टर **रसिक मोतीलाल शेटीया** रा. हंगे यांनी मंडळास **रु.३१,०००/-** देणगी दिली.




पाटबंधारे विभागात कार्यकारी अभियंता असलेले **श्री.बापूसाहेब रंगनाथ पवार** रा.वडगाव आमली यांनी मंडळास **रु.३०,०००/-** देणगी दिली.





श्री.किसन गागरे    श्री.संजय झावरे


साई जेनसेट कंपनीचे संचालक **श्री. किसन सावळेराम गागरे** रा.टाकळी ढोकेश्वर व **श्री. संजय आप्पासाहेब झावरे** रा. गारगुंडी यांनी कंपनीतर्फे **रु.२७,५५१/-** देणगी दिली.




**श्री.विजयकुमार जगन्नाथ खिलारी** रा.टाकळी ढोकेश्वर आर.सी.सी. कन्सलटंट यांनी मंडळाच्या वसतीगृहाचे आर.सी.सी. डिझाईन केले असून त्या कामाची फी **रु.२६,६००/-** न घेता मंडळास देणगी दिली.



प्रसिद्ध सिव्हील कॉन्ट्रॅक्टर **श्री.बबनराव दगडू शेळके** रा.चोंभूत यांनी मंडळास **रु.२६,०००/-** देणगी दिली.



टाटा मोटर्समधून डिव्हीजनल मॅनेजर म्हणून सेवानिवृत्त झालेले व श्री अँड श्री उद्योगाचे डायरेक्टर **श्री. गुलाबराव महादेव मातेरे** रा.बाभुळवाडे यांनी मंडळास **रु.२५,००१/-** देणगी दिली.



पोलीस सब इन्स्पेक्टर ते समाज कल्याण अधिकारी असा प्रवास केलेले व लोणी हवेली येथील डी.एड्. कॉलेजचे संचालक **श्री. अरूण चांगदेव कोल्हे** रा.लोणी हवेली यांनी मंडळास **रु.२५,०००/-** देणगी दिली.



दिलासा इन्स्टि.ऑफ लर्निंग अँड सोशल सर्व्हीस अॅक्टीव्हिटीज, पुणे या संस्थेचे विश्वस्त व बांधकाम व्यावसायीक **श्री.सदाशिव गणपत थोरात** रा.करंदी यांनी मंडळास **रु.२५,०००/-** देणगी दिली.

## वसतिगृह बांधकामास सढळ हाताने मदत करा !

पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वसतिगृहाचे बांधकाम सुरु करीत आहोत. सदर बांधकामास निधीची आवश्यकता असल्याने व निधी संकलन वेगाने होण्याचे दृष्टीने निधी संकलन समिती स्थान करण्यात आली असून या समितीतील सदस्यांना सहकार्य करावे व प्रत्येकाने वसतिगृह बांधकामातील आपला खारीचा वाटा उचलावा ही विनंती.

### निधी संकलन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| **१)** | **बाजीराव झुंजारराव जगदाळे** | **अध्यक्ष** | **९०११०२१४३०** |
| २) | विश्वनाथ यादवराव कोरडे | उपाध्यक्ष | ९०११०१८९०१ |
| ३) | हौसाराम विठ्ठलराव घोडके | सदस्य | ९४२०६९६७९० |
| ४) | अशोक चुनीलाल कटारिया | सदस्य | ९४२२०३६७०१ |
| ५) | अनंतराव महादेव मातेरे | सदस्य | ९८२२२४७४६३ |
| ६) | मधुकर हौशाभाऊ शिरोळे | सदस्य | ९९२२१६६१२५ |
| ७) | सखाराम कोंडीबा गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| ८) | सुनिल कुंडलिक पोटे | सदस्य | ९२२६९२१०८८ |
| ९) | तारकराम सिताराम झावरे | सदस्य | ९४२३७८८९१७ |

## दहावी

| | |
|---|---|
| कु.स्नेहल दत्तात्रय बांडे रा.टाकळी ढोकेश्वर | ९५% |
| कु.ऋतुजा बाळासाहेब बांडे, रा.टाकळी ढो. | ९५% |
| कु.ऋतुजा केरू गवळी, रा.बाबुर्डी | ९२% |
| कुमार राहुल प्रकाश रोहोकले, रा.भाळवणी | ९२% |
| कुमार महेश सुरेश ठाणगे, रा.तिखोल | ९१% |
| कु.स्मिता प्रभुशंकर होन, रा.अळकुटी | ९०% |
| कुमार आदित्य भास्कर वराळ, रा.निघोज | ९०% |
| कु.वीणा संजीव धुमाळ, रा.लोणी मावळा | ८९% |
| कु.विद्या लक्ष्मण तिकोणे, रा.पाडळी दर्या | ८८% |
| कुमार प्रदीप संजय बागुल रा.वनकुटे | ८८% |
| कुमार आकाश नारायण जगदाळे, रा.बाभुळवाडे | ८८% |
| कु.पल्लवी किसन ठुबे, रा.निघोज | ८७% |
| कु.ऐश्वर्या सुनील औटी, रा.पारनेर | ८७% |
| कुमार किरण निळकंठ मापारी, रा.राळेगण सि. | ८७% |
| कुमार सागर रोहीदास गागरे, रा.वनकुटे | ८६% |
| कुमार रिषीकेश सुनील वाघुंडे, रा.कान्हूर पठार | ८५% |
| कु.केतकी दत्तात्रय पठारे, रा.वाळवणे | ८३% |
| कु.अश्विनी जयसिंग मापारी रा.राळेगण सिद्धी | ८१% |
| कुमार दिपक गोरक्ष तिकोणे रा.पाडळी दर्या | ८०% |
| कु.रेश्मा अशोक ठोंबरे रा.यादववाडी | ७८% |
| कु.पुजा बाळासाहेब शिंदे, रा.पिंपरी पठार | ७५% |
| कु.शुभांगी बाळासाहेब रेपाळे, रा.पुणेवाडी | ७३% |
| कुमार विश्वजीत दिलीप बागुल, रा.मांडवे खुर्द | ६८% |

### इयत्ता १२वी

| | |
|---|---|
| कुमार ऋषीकेश केरू गवळी, रा.बाबुर्डी | ८५% |
| कुमार रोहीत रघुनाथ व्यवहारे, रा.कान्हूर पठार | ८५% |
| कु.प्रतिक्षा पंजाबराव शेळके, रा.नारायणगव्हाण | ८५% |
| कुमार जयदीप प्रकाश ठुबे, रा.कान्हूर पठार | ७५% |

## ऋणनिर्देश !

ज्या ज्या हितचिंतक सभासद व देणगीदारांनी संस्थेस देणगी दिलेली आहे त्या सर्वांच्या प्रती मंडळ कृतज्ञ आहे. हा लोभ असाच वृद्धींगत व्हावा हीच अपेक्षा !

**- सर्व कायकारिणी सभासद**

# दुःखद निधन



❉ श्री.हेमराजजी मोतीलालजी भळगट (वय ८८) रा. कर्जुले हरेश्वर यांचे दुःखद निधन दि.२६.०७.२००९ रोजी झाले.

❉ श्री.सामाजिक कार्यकर्ते व जुन्या पिढीतील नामवंत कुस्तीगीर श्री.तुळशीराम नारायण कळमकर (वय ९४) रा. कळमकरवाडी यांचे दुःखद निधन दि.१७.०९.२००९ रोजी झाले. तसेच त्यांच्या पत्नी देऊबाई (वय ८४) यांचे दुःखद निधन दिनांक १४.१०.२००९ रोजी झाले.





❉ श्रीमती भामाबाई दत्तात्रय खोसे यांचे दुःखद निधन दि.१९.०९.२००९ रोजी झाले.



❉ सौ. हौसाबाई विश्वनाथ झंजाड (वय ७२) रा.चिंचोली यांचे दुखःद निधन दि.१०.१०.२००९ रोजी झाले.



❉ श्री.गोपाळा महादू रांधवन (वय ८८) रा.टाकळी ढोकेश्वर यांचे दुःखद निधन दि.१५.१०.२००९ रोजी झाले.

❉ श्री.धोंडीभाऊ जिजाबा व्यवहारे (वय ८५) रा.कान्हूर पठार यांचे दुःखद निधन दि.१७.१०.२००९ रोजी झाले.


❉ श्री.मधुकर काशिनाथ ढुमणे (वय ६०) रा. अळकुटी यांचे दुःखद निधन दि.२६.१०.२००९ रोजी झाले.

❉ श्री.एकनाथ रामभाऊ अटकर रा.कान्हूर पठार यांचे दुःखद निधन दि.२६.१०.२००९ रोजी झाले.

❉ श्रीमती सुंदराबाई गणपत दाते (वय ७२) रा.कर्जुले हरेश्वर यांचे दुःखद निधन दि.०१.११.२००९ रोजी झाले.



❉ श्रीमती जानूबाई तबाजी थोरात (वय १०७) रा.पिंपरी जलसेन यांचे दुःखद निधन दि.१०.११.२००९ रोजी झाले.



❉ श्रीमती शेवंताबाई बाळासाहेब ठुबे (वय ८८) रा.पारनेर यांचे दुःखद निधन दि.१०.११.२००९ रोजी झाले. ''शेवंताची फुले'' हा त्यांचा पारंपारीक

# नांदा सौख्य भरे

- श्री.गवराम महादू मोरे रा.वडझिरे यांची सुकन्या **सौ.प्रतिक्षा** व श्री.ज्ञानदेव नारायण भालेराव रा.कळंब ता.आंबेगाव जि.पुणे यांचे सुपुत्र **चि.अमित** यांचा शुभविवाह दिनांक ०४.०८.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.यशवंत वसंत देखणे रा.गोरेगाव यांची सुकन्या **सौ.अनुजा** व श्री.उत्तमकुमार वर्मा रा.इंदौर (म.प्र.) यांचे सुपुत्र **चि.वरूण** यांचा शुभविवाह दिनांक २९.१०.२००९ रोजी संपन्न झाला.
- ॲड. तुषार भिमाजी कोठावळे रा.सांगवी सूर्या यांचे सुपुत्र **चि. केतन** व श्री. प्रकाश शंकरराव मासूळकर रा. पिंपरी पुणे यांची सुकन्या **सौ.प्रियंका** यांचा शुभविवाह दिनांक ०१.११.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.अनंत सुखदेव जाधव, रा.वेसदरे यांचे सुपुत्र **चि.धनंजय उर्फ निलेश** व श्री. रामदास नाथूजी कार्ले रा.खुपटी, ता.नेवासा यांची सुकन्या **सौ. यमुना उर्फ अदिती** यांचा शुभविवाह दिनांक ०१.११.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.सुरेश रामचंद्र खराडे रा.निघोज यांची सुकन्या **सौ.मनीषा** व श्री.महावीर प्रसाद अग्रवाल रा.बिराटनगर, नेपाळ यांचे सुपुत्र **चि.अजयकुमार** यांचा शुभविवाह दि.१३.११.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.विठ्ठलराव हनुमंत जावळे रा.दिवटे ता.शेवगाव यांचे सुपुत्र **चि.प्रताप** व श्री.मधुकर मार्तंडराव काळे रा.वाडी नांदूर ता.पैठण, जि.औरंगाबाद यांची सुकन्या **सौ.रुपाली** यांचा शुभविवाह दि. १९.११.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.जावळे यांनी मंडळास **रु.१००१/-** देणगी दिली.
- श्री. दत्तात्रय तुकाराम दिवटे रा.बाबुर्डी यांचे द्वितीय सुपुत्र **चि.सुदाम** व श्री.हरिदास कृष्णाजी म्हस्के रा.गुऱ्होळी ता.पुरंदर यांची सुकन्या **सौ.निलीमा** यांचा शुभविवाह दि. २२.११.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.दिवटे यांनी **रु.२०००/-** देणगी दिली.
- श्री. रामदास बाजीराव नांगरे रा.गोरेगाव यांची सुकन्या **सौ. संध्या** व श्री.विष्णू मेथाजी बोरकर रा.वडझिरे यांचे सुपुत्र **चि.विवेक** यांचा शुभविवाह दिनांक २७.११.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.शरद यादवराव वाबळे रा.घाणेगाव यांचे सुपुत्र **चि.अजय** व श्री.मधुकर श्रीपती शिर्के रा.पिंपळनेर यांची सुकन्या **सौ.वर्षा** यांचा शुभविवाह दि.२९.११.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.अंबादास पाटीलबुवा खरमाळे रा.भांडगाव यांचे सुपुत्र **चि.राजेंद्र** व श्री.गोरखनाथ गोपाळ गुंजाळ रा.वडगाव आमली यांची सुकन्या **सौ.मेनका** यांचा शुभविवाह दि. २९.११.२००९ रोजी संपन्न झाला. या मंगलप्रसंगी दोन्ही कुटुंबियांनी मंडळास प्रत्येकी **रु.१०००/-** देणगी दिली.
- श्री. दत्तात्रय तुकाराम दिवटे रा.बाबुर्डी यांचे तृतीय सुपुत्र **चि.निलेश** व श्री.रामदास विठ्ठलराव नवले रा.कारेगाव, ता.शिरुर यांची सुकन्या **सौ.भाग्यश्री** यांचा शुभविवाह दि. २९.११.२००९ रोजी संपन्न झाला. या शुभविवाहानिमित्त श्री.दिवटे यांनी **रु.२०००/-** देणगी दिली.
- श्री. तात्याभाऊ बाबुराव लंके, रा.निघोज यांचे सुपुत्र **चि.हेमंत** व श्री.शहाजी मळीभाऊ लामखडे रा.निघोज यांची सुकन्या **सौ.शिला** यांचा शुभविवाह दि. २९.११.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.सोपानराव पाटीलबुवा एरंडे रा.वडझिरे यांचे सुपुत्र **चि.अमित** व श्री.देवेंद्र बाबुराव कामठे रा.पुणे यांची सुकन्या **सौ.नेहा** यांचा शुभविवाह दि. ०८.१२.२००९ रोजी संपन्न झाला. या मंगलप्रसंगी श्री.सोपानराव एरंडे यांनी **रु.२०००/-** देणगी दिली.
- श्री.संपतराव त्रिंबकराव गाजरे रा.पिंपळनेर यांचे सुपुत्र **चि.प्रदीप** व श्री.अर्जुन संपतराव वाबळे रा.वासुंदे यांची सुकन्या **सौ.कोमल** यांचा शुभविवाह दि.१३.१२.२००९ रोजी संपन्न झाला.
- श्री.सखाराम मारुतराव जगताप रा.गोरेगाव यांचे सुपुत्र **चि.सचीन** व श्री.लक्ष्मण दादू सूर्यवंशी रा.काशीळ, ता.जि.सातारा यांची सुकन्या **सौ.स्वाती** यांचा शुभविवाह दि. २१.१२.२००९ रोजी संपन्न झाला.

## कृतज्ञता



पिंपरी चिंचवड शहरात ज्यांनी दातृत्वाचा आदर्श निर्माण केला असे आदरणीय कांतीलालजी खिंवसरा घाणेगावकर यांचे सुपुत्र श्री.सिद्धार्थ यांनी मंडळाच्या कार्यक्रमास त्यांच्या मालकीचे निर्मला लॉन्स मंगल कार्यालय विनामूल्य देवून आपणही 'आपणही एक पाऊल पुढे आहोत' असे दाखवून दिले. एरवी या कार्यालयाचे भाडे रु.६५०००/- आहे.

सहकार्याबद्दल मंडळ ऋणी आहे.

# आपण असे केले तर



**मरहूम सौ.आमिनाबी नुरमहंमद पठाण** रा.पिंपरी जलसेन यांचे दि. ०३.१२.२००९ चे द्वितीय स्मृती दिनानिमित्त सुपुत्र डॉ.शहाबुद्दीन (कुलगुरु, नागपूर विद्यापीठ) यांनी मंडळास **रु.६४०००/-** देणगी दिली.



**कै.डॉ.कृष्णराव मनाजी काळे** रा.पिंपरी जलसेन यांचे स्मरणार्थ पत्नी श्रीमती विमलाबाई व सुपुत्र डॉ.जयदीप यांनी मंडळास **रुपये ६१,००१/-** देणगी दिली.



**कै.सरस्वतीबाई बाळासाहेब देशमाने** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ सुकन्या सौ.सुमन रामचंद्र देशमाने बोरूडे, डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य (सेवानिवृत्त) व जामात ॲड.रामचंद्र विठोबा बोरुडे रा.पिंपरी जलसेन यांनी मंडळास **रु.६१०००/-** देणगी दिली.




**कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२००९ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.अनिकेत यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै. सौ. सुशिला मारुती पोटघन** रा.जातेगाव यांच्या दिनांक १७.०८.२००९ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.अविनाश यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.

**कै.सौ.सरोजीनीबाई भानुदास गादीया** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ सुपुत्र श्री.चंद्रकांत यांनी मंडळास **रु.५०००/-** देणगी दिली.



**कै.दत्तात्रय रामचंद्र बोरुडे** रा.करंदी यांच्या दिनांक ३०.१२.२००९ रोजी येणाऱ्या प्रथम स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.बाळासाहेब यांनी मंडळास **रु.२००१/-** देणगी दिली.

**स्व.रामचंदजी मोतीलाल कर्नावट**, खडकवाडी (मृत्यू दि.१६.११.१९७५) यांचे स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.झुंबरलाल यांनी त्यांचे बंधू-भगिनींतर्फे मंडळास **रु.५००१/-** देणगी दिली.



**कु.विश्वजीत** यांच्या वाढदिवसा निमित्त पिताश्री प्रा.दिलीप वामन बागूल रा.मांडवे खुर्द यांनी मंडळास **रु.२५००/-** देणगी दिली.




**श्रीमती जोत्स्नादेवी भालचंद्र ढुबे** व त्यांचे सुपुत्र **श्री.दिपक भालचंद्र ढुबे,** कार्यकारी अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सेवानिवृत्त) यांनी मंडळास **रु.६१,०००/-** देणगी दिली.


**कै.गेणू आबाजी टोणगे** रा.कोहकडी यांचे दि. १८.११.२००९ चे स्मृती दिनानिमित्त नातू संभाजी दामोदर टोणगे यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.




**कै.शेवंताबाई भाऊसाहेब गवळी** रा.बाबुर्डी यांचे स्मरणार्थ सुपुत्र ॲड.केरू भाऊसाहेब गवळी यांनी मंडळास रु.५००१/- देणगी दिली.




**कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांचे दि.०८.०८.२००९ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै.सदाशिव किसन शिंदे** रा. सारोळे आडवाई यांच्या दि.२४.०१.२०१० च्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.विकास यांनी मंडळास रु.१००१/- देणगी दिली.



**श्री.भास्कर विठ्ठलराव घोडके**, रा.पारनेर यांनी त्यांच्या नुतन घराच्या वास्तुशांती प्रित्यर्थ मंडळास **रु.२०००/-** देणगी दिली.




**कै.आबासाहेब पुंजाजी लगड गुरूजी**, रा.लोणी ता.राहाता यांचे स्मरणार्थ सुपुत्र ॲड.सुरेश आबासाहेब लगड (सहाय्यक सरकारी वकील, अहमदनगर न्यायालय) यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.




**कै.अनुसयाबाई सखाराम जगताप** रा.गोरेगाव यांचे स्मरणार्थ सुपुत्र सखाराम यांनी मंडळास **रु.६१,०००/-** देणगी दिली.

## आपण असे केले तर



श्री.भास्करराव भिकाजी शेळके रा.भोंद्रे यांनी जेष्ठ बंधू **कै.वसंतराव व पिताश्री कै.भिकाजी मारुती शेळके गुरुजी** यांचे स्मरणार्थ **रु.६१,००१/-** देणगी दिली.




श्री.पोपटराव देशमुख

**कै.सोनाजी राधोजी देशमुख उर्फ मास्तर** रा.पळवे यांचे स्मरणार्थ सुपुत्र पोपटराव यांनी मंडळास **रु.६१,०००/-** देणगी दिली.


## भावपूर्ण निरोप



**श्री.पुरुषोत्तम केशवराव गरूड**, रा.कान्हूर पठार हे युनीयन बँक ऑफ इंडिया मधून दिनांक ३१.१०.२००९ रोजी ३७ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमीत्त त्यांनी मंडळास **रु.२०००/-** देणगी दिली.



**श्री.दीपक भालचंद्र ठुबे** रा.कान्हूर पठार हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून कार्यकारी अभियंता म्हणून दिनांक ३०.११.२००९ रोजी ३४ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमीत्त त्यांनी मंडळास **रु.६१,०००/-** देणगी दिली.



**श्री.संभाजी यशवंत बोरूडे** रा.बाभुळवाडे हे अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातून शिक्षण विस्तार अधिकारी या पदावरून दि.३१ ऑक्टोबर २००९ रोजी सेवानिवृत्त झाले.

ॐ
हॉटेल सवेरा
**प्रोप्रा.: सौ.प्रमिला पठारे**
**श्री.दत्तात्रय पठारे**

आमच्याकडे स्वादिष्ट वडापाव, पॅटिस,
भेळ व इतर खाद्यपदार्थ मिळतील.
कंपनीच्या ऑर्डर्स स्विकारल्या जातील.

**गणपती मंदिराशेजारी, चिखली रोड, कुदळवाडी,**
**पुणे ४१२११४. मो. ९८५००२५२०४, ३२९२३२७४**

## अभिनंदन




आमदार **श्री.विजयराव भास्करराव औटी** यांची महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या ऑक्टोबर २००९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत **पारनेर** मतदार संघातर्फे दुसऱ्यांना **आमदार** म्हणून निवड झाली.



आमदार **श्री.सितारामजी चिमाजी घनदाट** रा.नांदूर पठार यांची महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या ऑक्टोबर २००९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत **गंगाखेड, जि.परभणी** मतदार संघातर्फे दुसऱ्यांना **आमदार** म्हणून निवड झाली.



नगरसेविका **सौ.उषाताई ज्ञानेश्वर कळमकर**, रा.कळमकरवाडी यांची पुणे महानगरपालीकेच्या विधी समितीच्या अध्यक्षपदी दिनांक २६.१०.२००९ रोजी निवड झाली.



**श्री.उल्हास पांडुरंग औटी**, रा.पारनेर यांची नॅशनल इंटीग्रेटेड मेडीकल असो. पुणे जिल्हा या संस्थेच्या अध्यक्षपदावर २००९ ते २०१० या वर्षासाठी निवड झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास रु.१०००/- देणगी दिली.



**कुमार शिवम जगन्नाथ शिंदे**, रा.हंगे, इयत्ता ६ वी यांस पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशनच्या जिल्हा स्तरावरील स्तरावरील स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषक मिळाले. तसेच राज्य स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. ब्लॅक बेल्ट परिक्षेत तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.


बांधकाम व्यवसायीक व सामाजिक कार्यकर्ते **श्री. अनंतराव महादेव मातेरे** रा.बाभुळवाडे यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल **'मराठा सेवा संघ पुणे'** तर्फे **'मराठा भूषण'** पुरस्कार मिळाला. ते पिंपरी चिंचवड मेट्रोपॉलीटीन शटल बॅडमिंटन असोसिएशनचे उपाध्यक्ष आहेत.



सौ.संगिता मातेरे व श्री.अनंतराव मातेरे पुरस्कार स्विकारताना

*-: कर्तृत्व पारनेरकरांचे :-*

# लोकाभिमुख कर्तव्यदक्ष अधिकारी श्री.दिपक भालचंद्र ठुबे



श्री.दिपक ठुबे



श्रीमती जोत्स्नादेवी ठुबे

पुनवडी ते पुणे असा प्रवास झालेली ही पुण्यनगरी. 'पुणे तेथे काय उणे' ही उक्ती सार्थ अभिमानाने मिरवणारी नगरी. पण ही बिरुदावली प्राप्त होण्यासाठी अनेकांनी अपार कष्ट व त्याग केला. अशा व्यक्तींपैकी सरदार विठ्ठलराव ठुबे. लौकीकार्थाने त्यांचे शिक्षण फक्त चौथी पर्यंतच परंतु जीवन विद्यापीठामध्ये त्यांनी स्वकर्तृत्वाने अनेक पराक्रम केले. आयुष्याची सुरुवात मजुरांपासून करून ते यशस्वी कॉन्ट्रॅक्टर झाले. शाळा, शासकीय कार्यालये, निवासस्थाने अशा अनेक तऱ्हेच्या इमारती त्यांनी बांधल्या त्या सुद्धा अल्प खर्चात. आजही पुणे शहरात त्यांनी बांधलेल्या वास्तु दिमाखाने त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतात. १९३५ ते १९४० पर्यंत ते पुणे सबर्बन नगरपालीकेचे अध्यक्ष होते. त्यांच्या व्यवसायीक कौशल्यामुळे व सामाजिक योगदानामुळे इंग्रजांनी त्यांना रावबहाद्दूर पदवी देऊन गौरवीले.

त्यांचेच नातू दिपक भालचंद्र ठुबे हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतून दि.३०.११.२००९ रोजी कार्यकारी अभियंता म्हणून सेवानिवृत्त झाले. रावबहाद्दूरांचा वारस असण्याचा त्यांना अभिमानच आहे. पण वारसा सांगून कर्तृत्व सिद्ध करण्याचे दिवस आता राहीले नाहीत. रावबहाद्दूरांच्या निधनानंतर त्यांचे वडील भालचंद्र उर्फ दादासाहेब हे काम पाहू लागले. दादासाहेब पुणे महानगरपालीकेचे लोकनियुक्त सभासद होते. अतिशय दिलदार पण व्यवहाराची सांगड न घालता आल्यामुळे, तसेच ज्यांच्यावर विश्वास टाकला त्यांनी फसविल्यामुळे त्यांना खूप मोठा आर्थिक फटका बसला. त्यातच त्यांचा दि.३०.०३.१९७१ रोजी अंत झाला.

कोल्हापूरचे सरदार हिंमत बहाद्दूर चव्हाण यांच्या सुकन्या श्रीमती ज्योत्स्नादेवी या दादासाहेबांच्या पत्नी. पतीनिधनानंतर हातपाय न गाळता त्यांनी येईल त्या प्रसंगांचा धिरोदात्तपणे सामना केला. परिस्थितीने त्यांच्यावर मात करण्यापूर्वीच त्यांनी परिस्थितीवर आरूढ होऊन सर्व प्रसंगांना यशस्वीरित्या तोंड देत आपल्या पाच मुली व एकुलता एक मुलगा यांना सुसंस्कारीत व सुशिक्षीत केले. सर्व मुला-मुलींची लग्ने व्यवस्थित पार पाडली. साहेबांच्या जडणघडणीत व प्रगतीमध्ये मातोश्री श्रीमती ज्योत्स्नादेवी यांचा सिंहाचा वाटा आहे. अजुनही साहेब मातोश्रींच्या शब्दांच्या बाहेर नाहीत. आजोबांचे कर्तृत्व, वडीलांचा दिलदारपणा व मातोश्रीचा त्याग व धीरगंभीर वृत्तीचा सुरेख संगम म्हणजे दिपक. कोणत्याही कामाची सुरुवात करण्यापूर्वी या त्रिमूर्ती त्यांच्या डोळ्यासमोर असत व त्यांच्याप्रमाणेच आपण व्हावे ही धडपड त्यांच्या अंगी असल्यामुळे येईल त्या परिस्थितीशी तोंड देण्याची सवय दिपकच्या अंगी भिनली.

दिपक यांचा जन्म १९.११.१९५१ चा. शिक्षण झाल्यानंतर १९ मे १९७६ मध्ये ते पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये तांत्रीक सुपरवायझर म्हणून रुजू झाले. पिंपरी चिंचवड या गावाची नुकतीच शहराकडून महानगराकडे वाटचाल सुरु झाली होती. घराण्यातच बांधकाम व्यवसाय असल्यामुळे या नवीन शहरात आपले व्यवसायीक कौशल्याला पूर्ण वाव मिळणार हे त्यांच्या चाणाक्ष नजरेने हेरले. आज जे पिंपरी चिंचवड शहर आहे त्याच्या जडणघडणीच्या प्रत्येक पायरीवर ठुबे साहेबांचे जबरदस्त योगदान आहे. त्यांच्या कामाचा उरक, तांत्रीक कौशल्य, सर्वांशी मिळून मिसळून वागण्याच्या पद्धतीमुळे ते एक लोकप्रिय अधिकारी झाले. नवीन नवीन जबाबदाऱ्या त्यांच्या अंगावर पडू लागल्या. जसजशा जबाबदाऱ्या वाढल्या तसतशी त्यांची पदोन्नती होत गेली व ते पालिकेचे कार्यकारी अभियंता झाले.

सार्वजनिक काम हे जनतेच्या पैशावर चालत असल्यामुळे त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रत्येक कामाची ते गुणवत्ता पारखून घेत असत. त्यामुळे प्रासंगिक कंत्राटदार तसेच नगरसेवकांशीसुद्धा त्यांची वादावादी होत असे. परंतु यामुळे त्यांचे कुणाशीही शत्रुत्व न येता, त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींनी त्यांचे कौतुकच केले. उलट माझ्या वार्डातले काम ठुबे साहेबांच्याकडे असेल तर ते योग्य पद्धतीनेच होईल याबद्दल प्रत्येकाची खात्री असे. महापालीकेतील प्रत्येक विभागात त्यांनी काम केलेले आहे.

साहेब सेवानिवृत्त झाले खरे परंतु त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना, वरिष्ठांना, लोकप्रतिनिधींना व मित्र परिवाराला आपण काहीतरी गमावले अशी भावना झाली. ही भावना म्हणजे त्यांच्या सचोटीचे प्रमाणपत्रच.

ठुबे साहेबांचे मूळ गाव कान्हूर पठार. त्यांनी ते कधी पाहीलेही नाही पण आपण पारनेर तालुक्याचे आहोत याबद्दल त्यांना नुसता अभिमान नाही तर मंडळाच्या प्रत्येक कामाची ते आस्थेवाईकपणे चौकशी करतात.

मंडळाने विद्यार्थी वसतिगृह बांधण्यासाठी जागा घेण्यापासून बांधकामाचा नकाशा मंजूर करण्यापर्यंत त्यांचे बहुमोल मार्गदर्शन व मदत झाली आहे. केवळ त्यांचेमुळेच आमची पालिकेकडील सर्वच कामे सुरळीत झाली. त्यांनी व मातोश्रींनी मंडळास रु.६१,०००/- देणगी दिली आहे. त्यांच्या आयुष्याचे हे दुसरे पर्व त्यांना आरोग्यदायी जावो हीच सदिच्छा !

शब्दांकन - हौसाराम घोडके

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२००८ ते ३१.०३.२००९ अखेरचे

| जमा | रुपये |
|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | |
| रोख | ७,०६८.०० |
| सुवर्णयुग सहकारी बँक | ७,७५,०४९.३४ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ७३,२०९.०० |
| बचत ठेव व्याज खाते | ३५,०७१.०० |
| मुदत ठेव व्याज खाते | १,२५,४८२.०० |
| बिल्डिंग फंड खाते | १८,५५,३९९.१७ |
| मुदत ठेव | १३,१०,०००.०० |
| टेंडर डिपॉझिट | २,३४,२५९.०० |
| लिजहोल्ड लँड बिल्डींग फंडास | २५,०००.०० |
| बोअरवेल बिल्डींग फंडास वर्ग | ९,३९६.०० |
| इमारत बिल्डींग फंडास वर्ग | ८७,२४७.८३ |
| मुदत ठेव येणे व्याज जमा | ३६४.०० |
| **एकूण रुपये** | **४५,३७,५४५.३४** |

| खर्च | रुपये |
|---|---|
| बँक चार्जेस खाते | २,००१.७३ |
| लिहिणावळ | ५,५००.०० |
| प्रवास खर्च खाते | ६,६९४.०० |
| शैक्षणिक मदत | १,०००.०० |
| शैक्षणिक - पुस्तक वाटप | ३३,५००.०० |
| वार्षिक मिटिंग व समारंभ खर्च | १,२००.०० |
| भूमिपूजन समारंभ | ७३,४७३.०० |
| पोस्टेज खर्च | ३,८००.०० |
| दुरुस्ती खर्च | ११६.०० |
| इलेक्ट्रिसिटी खर्च | १७१.०० |
| जमीन सफाई | ५००.०० |
| झेरॉक्स आणि टायपिंग | ५,७९८.०० |
| त्रैमासिक छपाई खर्च | १८,६००.०० |
| प्रिंटींग व स्टेशनरी | ४,६७०.०० |
| ऑडिट फी | ३,५००.०० |
| कोर्ट खर्च खाते | २६,५०५.०० |
| धर्मदाय आयुक्त अंशदान | १,५४४.०० |
| प्रॉपर्टी टॅक्स | ४,९८४.०० |
| किरकोळ खर्च | ५७५.०० |
| इमारत बांधकाम | १९,९२,०९१.०० |
| जमीन मोजणी | ३३,०००.०० |
| मोटार पंप | २४,१६५.०० |
| एम.एस.इ.बी.डिपॉझिट | १०,०००.०० |
| बोअरवेल | १०,०५०.०० |
| टेंडर डिपॉझिट | १,२९,६००.०० |
| मुदत ठेव | १३,३९,७५९.०० |
| टि.डी.एस. | १७,१७२.०० |
| वसतिगृह डिपॉ.बिल्डींग फंडास वर्ग | १,८००.०० |
| **अखेरची शिल्लक** | |
| रोख | ५९३.०० |
| सुवर्णयुग सहकारी बँक | ३,०५,८२३.६१ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ४,७९,३६०.०० |
| **एकूण रुपये** | **४५,३७,५४५.३४** |

पुणे,
दिनांक : ०७.०७.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| **बाजीराव जगदाळे** | **सखाराम गागरे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२००८ ते ३१.३.२००९ अखेरचे

| खर्च | रुपये | जमा | रुपये |
|---|---|---|---|
| बँक चार्जेस खाते | २,००१.७३ | | |
| लिहिणावळ | ५,५००.०० | बचत ठेव व्याज खाते | ३५,०७१.०० |
| प्रवास खर्च खाते | ६,६९४.०० | | |
| शैक्षणिक मदत | १,०००.०० | | |
| शैक्षणिक - पुस्तक वाटप | ३३,५००.०० | | |
| वार्षिक मिटींग व समारंभ खर्च | १,२००.०० | मुदत ठेव व्याज खाते | १,२५,४८२.०० |
| भूमिपूजन समारंभ | ७३,४७३.०० | | |
| पोस्टेज खर्च | ३,८००.०० | | |
| दुरुस्ती खर्च | ११६.०० | | |
| इलेक्ट्रिसिटी खर्च | १७१.०० | | |
| जमीन सफाई | ५००.०० | | |
| झेरॉक्स आणि टायपिंग | ५,७९८.०० | | |
| त्रैमासिक छपाई खर्च | १८,६००.०० | | |
| प्रिंटींग आणि स्टेशनरी | ४,६७०.०० | | |
| ऑडिट फी | ३,५००.०० | | |
| कोर्ट खर्च खाते | २६,५०५.०० | | |
| धर्मदाय आयुक्त कर खाते | १,५४४.०० | | |
| प्रॉपर्टी टॅक्स | ४,९८४.०० | उत्पन्नापेक्षा जादा खर्च ताळेबंदास वर्ग | ३४,१४२.५४ |
| किरकोळ खर्च | ५७५.०० | | |
| घसारा | ५६३.८१ | | |
| **एकूण रुपये** | **१,९४,६९५.५४** | **एकूण रुपये** | **१,९४,६९५.५४** |

पुणे,
दिनांक : ०७.०७.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| **बाजीराव जगदाळे** | **सखाराम गागरे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२००९ अखेरचे

| जमा | रुपये | रुपये |
|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० |
| **इतर निधी** | | |
| **बिल्डींग फंड** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | २८,६४,९३३.८६ | |
| अधिक जमा | १८,५५,३९९.१७ | ४७,२०,३३३.०३ |
| **शैक्षणिक फंड** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० |
| **अंत्यविधी जमा निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० |
| **टेंडर डिपॉझिट** | | १,०४,६५९.०० |
| **उत्पन्न खर्च खाते** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,६४,४५६.१२ | |
| वजा - तोटा | ३४,१४२.५४ | १,३०,३१३.५८ |
| **एकूण रुपये** | | **५२,५५,४४६.६१** |

| खर्च | रुपये | रुपये |
|---|---|---|
| **स्थिर मालमत्ता** | | |
| **लिजहोल्ड लॅण्ड** -मागील ताळेबंदाप्रमाणे | २५,०००.०० | |
| बिल्डींग फंडास वर्ग | २५,०००.०० | |
| **बोअरवेल** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ९,६९६.०० | |
| बिल्डींग फंडास वर्ग | ९,६९६.०० | |
| **इमारत** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ८७,२४७.८३ | |
| बिल्डींग फंडास वर्ग | ८७,२४७.८३ | |
| **जमीन खरेदी** - मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| **इमारत बांधकाम** - प्राथमिक खर्च - मागील | | ४८,७६०.०० |
| **इमारत बांधकाम** - चालू वर्षी | | १९,९२,०९१.०० |
| **जमीन मोजणी** - चालू वर्षी | | ३३,०००.०० |
| **बोअरवेल** - चालू वर्षी | | १०,०५०.०० |
| **मोटार पंप** - चालू वर्षी | | २४,१६५.०० |
| **मुदत ठेव** | | १४,६४,७५९.०० |
| **फर्निचर** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ५६३.८१ | |
| वजा-घसारा | ५६३.८१ | |
| **वृक्षसंवर्धन ठेव** - मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| **एम.एस.ई.बी.डिपॉझिट** - चालू वर्षी | | १०,०००.०० |
| टि.डि.एस. | | ३२,५३४.०० |
| **अखेरची शिल्लक** | | |
| रोख | ५९३.०० | |
| सुवर्णयुग सह.बँक | ३,०५,८२३.६१ | |
| स्टेट बँक | ४,७९,३६०.०० | ७,८५,७७६.६१ |
| **एकूण रुपये** | | **५२,५५,४४६.६१** |


पुणे,
दिनांक : ०७.०७.२००९

**बाजीराव जगदाळे** सेक्रेटरी

**सखाराम गागरे** उपाध्यक्ष

**हौसाराम घोडके** अध्यक्ष

**मे.के.बी.साळुंके अँड कं.** लेखा परीक्षक




## -: विशेष सूचना :-

☺ कार्यक्रम वेळेवर सुरु होईल.

☺ वसतिगृह उद्घाटन झाल्यानंतर निर्मला लॉन्स मंगल कार्यालयात कार्यक्रम सुरु होतील. सभासदांनी मंगल कार्यालयात थांबले तरी चालेल.

☺ **कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घ्यावा.**

☺ सिमला ऑफीस, शिवाजीनगर, पुणे येथून चिंचवडला जाणाऱ्या बसमधून डांगे चौकात उतरावे.

☺ वसतिगृहाच्या बांधकामासाठी ज्यांना देणग्या द्यावयाच्या आहेत त्यांनी मंडळाशी संपर्क साधावा.

☺ सर्वांनी उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री.सुनील तोटे यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ३९५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून ए-१/१ यशोधन सोसायटी, चिंतामणीनगर भाग-२, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०